Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ) ISSN No. 2394-8426

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ) with International Impact Factor 2.254 ISSN No. 2394-8426 Social Issues & Its Researchial Remedies

# कुपोषण एक सामाजिक समस्या

प्रा. एस.आर. लव्हाळे

इंदिरा महाविद्यालय, कळंब जि. यवतमाळ

प्रस्तावना :–

सुदृढ बालके ही देशाची संपत्ती. देश जर बळकट आणि कणखर बनवायचा असेल तर कुपोषणाच्या समस्येचा नायनाट करणे आवश्यक आहे. पूर्वी कुपोषणाची समस्या ही मेळघाट, भामरागड या सारख्या भागापुरती मर्यादीत होती परंतु आता या समस्येने उग्ररूप धारण केले आहे. कुपोषणाची समस्या ही अवध्या जगासाठी एक आव्हान असल्याचा गंभीर इशारा जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे.

भारत हा कृषिप्रधान देश असल्याने बहुसंख्य जनता ही ग्रामिण भागात राहाते. अज्ञान, गरीबी, अंधश्रध्दा अशा जाळ्यात ती सापडली आहे. कुठल्याही देशाच्या प्रगतीच्या मार्ग हा देशातील लोकांच्या आरोग्यावर अवलंबुन असतो. आरोग्य व आहार याचा घनिष्ठ संबंध आहे. आपल्या देशाते गरिबीचे प्रमाण इतके जास्त आहे की, ४० प्रतिशत ग्रामीण व ५० प्रतिशत शहरी जनता यांची रोजची कॅलरीची आवश्यकता पूर्ण होत नाही. तसेच भारतात एकुण आहाराविषयी जागरूकता कमी आहे. आहाराविषयीच्या गैरसमजुतीमुळे गरोदर पणात स्त्रिला योग्य आहार मिळत नाही व याचा परिणाम गर्भवती स्त्री व गर्भावर होतो व कुपोषीत बालक जन्माला येते.

कळंब तालुका हा यवतमाळ जिल्ह्यात येतो. यवतमाळ जिल्ह्यात १६ तालुके आहेत. जिल्ह्यात परधान, गोंड, कोलाम, तेलगु, बंजारा लोकांची वस्ती आहे. कळंब तालुक्यात आदिवासी लोक जास्त असल्यामुळे अंधश्रध्दाश अज्ञान, रूढी, परंपरा, गैरसमजुती, सकस आहाराचा अभाव, आरोग्य सुविधांचा अभावं, औषधोपचार करून घेण्याचे कमी प्रमाण, शासकीय योजनेच्या माहितीचा अभाव, भेसळयुक्त खाणे, गलिच्छ वस्ती, अशुध्द पाणी पुरवठा, रोजगार व शिक्षणाचा अभाव इत्यादी गोष्टीमुळे कुपोषीत बालकांची संख्या भरपूर आहे.

आदिवासी जमातीचे जीवन हे निसर्गावर अवलंबून असते. मोळ्या, डिंक, मध, तेंदूपत्ता इत्यादी विकुन ते उदरनिर्वाह करतात आणि पारंपारीक शेती काहींचा व्यवसाय असुन निसर्गाच्या लहरीपणामुळे आज उत्पन्नाचे प्रमाण कमी झाले आहे. परिणामी कर्ज काढावे लागत आहे. गरीबी, बेकारी व उपासमार इत्यादी समस्यांनी ग्रस्त असलेल्या आदिवासी जमातीमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे.

कुपोषणाची व्याख्या :– "भोज्यतत्वे गुण आणि परीमाणाने अपर्याप्त किंवा आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात उपयोगात आणल्याने शरीरावर जे हानीकारक परिणाम होतात त्याला कुपोषण म्हणतात".

राष्ट्रीय कुटूंब आरोग्य सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात कमी वजनाच्या कुपोषित बालकाचे प्रमा ४० टक्के आहे. राज्यभगात तीव्र कुपोषित गटात ३ ते ३.५ टक्के बालके असुन मध्यम तिव्र कुपोषीत गटात १२ ते १३ टक्के आहे. राज्यात ८२ लक्ष बालकांमध्ये १५ टक्के बालक कुपोषित असुन सुमारे १३ लक्ष इतकी कुपोषित बालकाची संख्या सध्याच्या सर्वेक्षणानुसार आहे.



Scanned with ACE Scanner

युनिसेफच्या सर्वेक्षणानुसार जगातील एकंदरीत कुपोषित बालकांपैकी १/३ कुपोषित बालके भारतात आहेत. भारतात कुपोषणाचा दर ४७ टक्के आहे. पाच वर्षाखालील सहा हजार बालके कुपोषणामुळे मृत्युमुखी पडतात. त्यात ६० ते ७० टक्के कुपोषण सौम्य श्रेणीचे २ ते ५ टक्के कुपोषण मध्यम श्रेणीचे व तीव्र श्रेणीचे आहे. कुपोषणाचे प्रमाण ५० ते ६० टक्के इतके आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार इ.स.२००८ मध्ये जगात दर बारा व्यक्तींमागे एक व्यक्ती कुपोषित होती. साडे तीन कोटीपेक्षा जास्त मृत्यु कुपोषणामुळे किंवा त्यामुळे उद्भवणाऱ्या रोगामुळे होते. संयुक्त राष्ट्राकडून उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार इ.स. २००९ मध्ये जगात सर्वाधिक कुपोषित व्यक्ती भारतात होत्या.

कुपोषणाची कारणे :—

१) अस्वच्छता २) शिक्षणाचा अभाव ३) अपुरा आणि कमी प्रतीचा आहार ४) गैरसमजुती व अंधश्रध्दा ५) जास्त अपत्य संख्या ६) दोन मुलांमध्ये कमी अंतर ७) स्तनपान न करणे ८) कमी वयात लग्न ९) रूढी व परंपरा १०) सवयी ११) अस्वच्छतेचा परिसर १२) बेरोजगारी १३) अन्न भेसळ १४) शिक्षणाचा अभाव १५) शासकीय योजनेच्या माहितीचा अभाव १५) व्यसनाधिनता १६) संस्कृतीचा प्रभाव १७) फॅशन आणि शहरीकरण

**कुपोषणामुळे होणारे परिणाम :—**

१) कार्यशक्ती कमी होते २) कमी उंची व कमी वजनाचे बालक ३) प्रथिनांच्या अभावी होणारे आजार ४) शरीरातील पोटाचा घेर फुगणे, वाढ खुंटणे व हातापायाच्या काड्या होणे ५) जीवनसत्व अ च्या अभावी डोळ्यांचे आजार होणे ६) लोहाच्या कमतरतेने होणारे रक्तक्षया सारखे आजार ७) जीवनसत्वाच्या अभावी मुडदुस बेरीबेरी सारखे आजार होणे ८) रोग प्रतिकार शक्ती कमी होणे ९) बौध्दीक, मानसिक, शारीरिक विकासात बाधा होवुन विकास खुंटतो १०) संसर्गजन्य आजाराला बळी पडणे ११) सतत कुपोषण होवून मृत्यु देखील होतो.

उपाययोजना :—

१) आहाराविषयी जनजागृती निर्माण करणे २) जन्मांपासून स्तनपान करणे ३) लोकांमधील अंधश्रध्दा व अज्ञान दुर करण्याचा प्रयत्न करणे ४) वेळेवर लसीकरण ५) योग्य वयात मुलीचे लग्न करणे ६)गर्भावतीची नोंदणी करणे ७) बाळ सहा महिन्याचा झाल्यावर त्याला पुरक आहार देणे ८) कोणताही आजार झाल्यास ताबडतोब उपचार करणे ९) प्रसुती दवाखान्यात करणे १०) अंधश्रध्देला बळी न पडता आरोग्य केंद्रांची मदत घ्यावी ११) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून आरोग्य व आहारा विषयी महत्व पटवून देणे १२) शासकीय योजनांचा फायदा लोकांपर्यंत पोहचविणे.

## Objectives (उद्दिष्टे)

१. कुपोषणाचा अर्थ आणि रूपरेषा समजून घेणे.

२. कुपोषणाचा बालकाच्या विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.

३. कुपोषणामुळे होणाऱ्या आजारांचा शोध घेणे.

४. कुपोषणाच्या कारणांचा शोध घेणे.



Scanned with ACE Scanner

५. कुपोषणाच्या संदर्भात शासनाच्या योजनेचे अध्ययन करणे
६. समाजामध्ये कुपोषण न होण्यासाठी उपाययोजना सुचविणे
७. बालकांचा आहारविषयक व आरोग्य विषयक दर्जा अभ्यासणे

## Hypothesis (गृहितके)

१. कुपोषणाच्या कारणांचा शोध घेवून उपाय योजना केल्यास कुपोषणाचे प्रमाण कमी होवू शकते.
२. मातेचा आहार व आरोग्याचा बालकाच्या आरोग्यावर परिणाम होतो.
३. कुपोषणामुळे रोग प्रतिकार शक्ती कमी होते व त्यामुळे अनेक आजार होतात.
४: कुपोषणामुळे बालकांचा विकास खुंटतो.
५. आवश्यक अन्नघटकांचा व समतोल आहाराचा अभाव असतो.

## Methodology:-

प्रस्तुत संशोधन हे कळंब तालुक्यात करण्यात येईल. या संशोधनासाठी कळंब तालुक्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील २०० कुपोषित मुलांची निवड करण्यात येईल.

संशोधन आराखडा :– या संशोधनासाठी नमुन्याचे सांख्यिकीय विश्लेषण व टक्केवारीनुसार प्रमाण विचलन आणि t test चा वापर करण्यात येईल.

निष्कर्ष :– मागासभागात दवाखान्यांची पुरेशी सोय नाही. दळणवळणाची सोय नसल्यामुळे आजारी बालकाला दवाखान्यात नेईपर्यंत तो जगलेच असे नाही. डॉक्टरांपेक्षा मांत्रीक, बाबा यावर मागास भागातील लोकांचा लोकांचा जास्त विश्वास असल्यामुळे ते डॉक्टराकडून उपचार घेत नाही, तर काळा दोरा बांधणे, डाग देणे इत्यादी उपचार करतात आणि त्यामुळे बऱ्याच बालकांना आपला जीव गमवावा लागतो. मेळघाट, धारणी, गडचिरोली या आदिवासी व मागास क्षेत्रात कुपोषणाचे प्रमाण अतिशय जास्त असल्याचे दिसुन येते. त्यामुळे तिथे बाल मृत्युचे प्रमाणही जास्त आहे.

संदर्भग्रंथ :– पोषण आणि आहारशास्त्र – त्रिवेनी फाकाडे, सुलभा गोंगे



Scanned with ACE Scanner